# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.३), कारंजा (लाड), जि. वाशिम यांच्या न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी बी. ए. नेरलीकर)**

## न्यायनिर्णय

(दिनांक ०८/०५/२०२६ ला घोषीत)

**सं.फौ.ख.क्र. ८९/२०२५** **निशाणी क्र.९ खाली**

१. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.सी. चव्हाण आणि आरोपीचे अधिवक्ता श्री.एम.सी. खंडारे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच अभियोग पक्षाने दाखल केलेला पुरावा सखोलपणे वाचला. अभियोग पक्षाच्या कथनावरुन आणि आरोपीने दोषारोप नाकारल्याने न्यायालयासमक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले आणि त्यावरील निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणमिमांसेसह येणेप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २८/०८/२०२४ रोजी १०.०० ते १०.३० वाजताच्या दरम्यान ग्राम मनभा, ता.कारंजा, जि.वाशिम येथे आरोपी त्याच्या ताब्यात विनापरवाना बेकायदेशीररित्या ९० मि.ली. क्षमतेचे देशी दारू बॉबी संत्राचे १६ नग बाळगून असतांना आढळून आला व त्यायोगे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही** |
| २. | काय आदेश ? | **आरोपी निर्दोष मुक्त** |

## !! का र ण मी मां सा !!

**२.** अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता पंच साक्षीदार क्र.१ रहेमान खान अयऊल्ला खान याची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपीविरुध्द अभिलेखावर कोणताही सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपीचा भारतीय न्याय सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

**मुद्दा क्र.१ करीताः–**

**३.** साक्षीदार क्र.१ रहेमान खान अयऊल्ला खान याने आपल्या पुराव्यात असे कथन केले आहे की, तो आरोपीला ओळखत नाही. दिनांक २८/०८/२०२४ रोजी पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. पोलीसांनी त्याच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही व आरोपीच्या ताब्यातून काहीही जप्त केले नाही. तसेच सा.क्र.१ रहेमान खान अयऊल्ला खान यास अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविला असता त्यावर त्याच्या सह्या असल्याची बाब त्याने मान्य केली. परंतु, पंचनाम्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सा.क्र.१ रहेमान खान अयऊल्ला खान याने अभियोग पक्षाच्या कथनास पूरक अशी साक्ष दिली नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे त्याचा उलटतपास नोंदविण्यात आला. परंतु अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान देखील सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या पृष्ट्यर्थ कोणतेही कथन केले नाही.

४. सदर प्रकरणात तपासण्यात आलेला एकमेव पंच साक्षीदार क्र.१ रहेमान खान अयऊल्ला खान याने अभियोग पक्षाच्या कथनास पूरक अशी साक्ष दिली नाही. त्यामुळे

आरोपीकडून कोणत्याही मुद्देमालाची जप्ती सिध्द झाली नाही. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, मोक्यावरून जप्त केलेल्या मुद्देमालापैकी ९० मि.ली. क्षमतेचे एक देशी दारू बॉबी संत्राचे कॉर्टर रासायनिक परिक्षणाकरीता वेगळे काढून त्यावर पंचाच्या, आरोपीच्या व त्यांच्या सहीचे कागदी लेबल लावून मोक्यावर लाखेने सिलबंद करून नमुना म्हणून राखून ठेवले. सदर नमूना रासायनिक परिक्षणाकरीता प्रयोग शाळेत पाठविण्यात आला होता. परंतु, या प्रकरणात रासायनिक पृथःकरण अहवाल दाखल असला तरीही सदर नमुना नेणा–या व्यक्तीस अभियोग पक्षाने तपासले नाही आणि त्याचे बयान देखील नोंदविले नसल्याचे अभिलेखावरून दिसून येते. त्यामुळे सदर नमुन्यामध्ये देशी दारू होती ही बाब सिध्द झाली नाही. करीता आरोपी हा विना परवाना बेकायदेशीररित्या देशी दारूचे ९० मि.ली. क्षमतेचे १६ नग बाळगुन असतांना मिळुन आला, ही बाब आरोपीविरूध्द कोणत्याही ठोस पुराव्याअभावी शाबीत होत नाही. तथ्यतः अभियोग पक्ष आरोपीचा दोष संयुक्तीक शंकेच्या पलीकडे जाऊन सिध्द करु शकला नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>**

**५.** उपरोक्त कारणमिमांसेवरून हे स्पष्ट होते की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेला दोषारोप संशयापलीकडे जाऊन सिध्द केला नाही. त्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब मुद्दा क्रमांक २ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी युनुस खॉ हिमायत खॉ यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) प्रमाणे कलम ६५(ई) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत दंडनीयअपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे पुर्वीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अपील कार्यकाळ संपल्यानंतर जप्त केलेले देशी दारू बॉबी संत्राचे ९० मि.ली. क्षमतेचे १५ नग याची राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, मंगरुळपीर यांनी कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावावी.

४. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता चे कलम ४८१ अन्वये पुर्तता करणेकामी त्याचे जामीनपत्र व स्वबंधपत्र रूपये ५,०००/– द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by NERLIKAR BHUSHAN ANANDRAO
Date: 2026.05.08 15:53:54 +0530

दिनांकः ०८/०५/२०२६

**(बी. ए. नेरलीकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट क्र.३), कारंजा (लाड).

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.V. Daware (Stenographer Grade-III) |
| Court Name | :- | $2^{nd}$ Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja, Dist. Washim. |
| Date | :- | 08/05/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 08/05/2026 |
| Order uploaded on | :- | 08/05/2026 |